सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❏ वर्ष - ४ थे ❏ अंक - ७२ वा ❏ अमरावती (महाराष्ट्र) ❏ बुधवार दि. २२ एप्रिल २०२६ ❏ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❏ मुल्य - १ रु. ❏ पृष्ठ -४

## राज्य मंत्रिमंडळाचे चार धडाकेबाज निर्णय

## साताऱ्यात आयटी पार्क, बायोगॅससाठी ५०० कोटींची तरतूद

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२२मुंबई–** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली २२ एप्रिल रोजी झालेल्या राज्य मंत्रिमंडळ बैठकीत विकास, शिक्षण आणि पर्यावरण या तिन्ही क्षेत्रांना चालना देणारे चार महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. या निर्णयांमुळे राज्यातील पायाभूत सुविधा, हरित ऊर्जा आणि शैक्षणिक क्षेत्रात सकारात्मक परिणाम होण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.बैठकीत महाराष्ट्र राज्य कॉम्प्रेस्ड बायोगॅस धोरणाला गती देण्यासाठी मोठा निर्णय घेण्यात आला. प्रत्येक जिल्ह्यात समन्वय समित्या स्थापन करून बायोगॅस प्रकल्प सार्वजनिक–खाजगी भागीदारी (झझझ) आणि हायब्रीड अन्युईटी तत्वावर राबविण्यात येणार आहेत. यासाठी चालू आर्थिक वर्षात तब्बल ५०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. या प्रकल्पांमुळे घनकचऱ्याचे पर्यावरणपूरक व्यवस्थापन होऊन हरितगृह वायू उत्सर्जनात घट होण्यास मदत होणार आहे.

उच्च व तंत्रशिक्षण क्षेत्रातही सरकारने दिलासा देणारा निर्णय घेतला आहे. राज्यातील सात आदर्श महाविद्यालयांतील शिक्षकांना (णऋछ) च्या निर्देशानुसार मूळ वेतन देण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच भविष्यातील भरती प्रक्रियेत या शिक्षकांना अतिरिक्त गुण




देण्याची तरतूद करण्यात आली असून, यामुळे शिक्षकवर्गात समाधान व्यक्त होत आहे. औद्योगिक विकासाला चालना देण्यासाठी सातारा जिल्ह्यातील मौजे नागेवाडी येथे आयटी पार्क उभारण्यासाठी ४२.५५ हेक्टर जमीन (चखऊऊ) ला देण्यास मंजुरी देण्यात आली आहे. या प्रकल्पामुळे स्थानिक युवकांना रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध होण्याची शक्यता आहे. याशिवाय, जमीन धारणा नियमांमध्ये बदल करत भोगवटादार वर्ग–२ मधून वर्ग–१ मध्ये रूपांतरासाठी अधिमूल्याची पुनर्रचना करण्यासही मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे. यासंदर्भातील अधिसूचना लवकरच जारी होणार आहे. दरम्यान, मुंबईतील (केईएम) रुग्णालयाच्या नामांतराचा मुद्दा पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. मंत्री यांनी या रुग्णालयाचे नाव कौशल्य श्रेष्ठ एकलव्य स्मारक रुग्णालय असे करण्याची मागणी मुंबई महानगरपालिकेकडे केली आहे. ब्रिटिशकालीन नाव बदलण्याच्या या प्रस्तावामुळे पुन्हा वाद निर्माण होण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

एकूणच, मंत्रिमंडळाच्या या निर्णयांमुळे राज्याच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळण्याचा सरकारचा दावा असला, तरी काही निर्णयांवर राजकीय आणि सामाजिक प्रतिक्रिया उमटण्याची चिन्हे दिसत आहेत.

## जिंकाच, अन्यथा पर्याय नाही..

## एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेची सत्तेची ‘पॉवर ब्लूप्रिंट’ तयार

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२२मुंबई–** स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी शिवसेनेने आता थेट रणशिंग फुंकले असून ’संपर्क मंत्री अभियान’ हे केवळ अभियान नसून सत्तेवर झेप घेण्याची स्पष्ट आणि आक्रमक ब्लूप्रिंट ठरणार असल्याचे बोलले जात आहे. राज्यातील २२ जिल्ह्यांमध्ये संघटन झपाट्याने मजबूत करत जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांवर ताबा मिळवण्याचा शिंदेसेनेने निर्धार केला आहे. शिवसेनेचे मुख्य नेते उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रत्येक संपर्क मंत्र्यांच्या खांद्यावर दोन जिल्ह्यांची जबाबदारी टाकत जिंकाच, अन्यथा पर्याय नाही असा स्पष्ट संदेश देण्यात आला आहे. उपमुख्यमंत्री यांच्या नंदनवन या निवासस्थानी एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली मंगळवारी रात्री उशिरा प्रमुख मंत्र्यांची, पदाधिकाऱ्यांची बैठक पार पडली

मागील स्थानिक स्वराज्य निवडणुकांमध्ये शिवसेनेने राज्यात क्रमांक दोनचा पक्ष म्हणून भक्कम स्थान मिळवले होते. या यशामुळे पक्षाच्या कामगिरीबाबत अपेक्षा




द्यायची ही पहिली अट आहे. ज्या जिल्ह्यांमध्ये पालकमंत्री आहेत, त्या ठिकाणी जिल्हा व तालुका स्तरावरील शासकीय समित्यांमध्ये शिवसेनेचे प्रतिनिधित्व आक्रमकपणे वाढवायचे, यासाठी

### कुणाकडे कुठली जबाबदारी?

गुलाबराव पाटील – जळगाव, नंदुरबार, उदय सामंत – नाशिक, अहमदनगर, योगेश कदम – ठाणे, पालघर, प्रकाश आबिटकर – नांदेड, हिंगोली, भरत गोगावले – बीड, आशिष जयस्वाल – जालना, प्रताप सरनाईक – अमरावती, अकोला, संजय राठोड – यवतमाळ, वाशिम, संजय शिरसाट – भंडारा, गोंदिया, प्रतापराव जाधव – नागपूर व वर्धा, शंभुराज देसाई – गडचिरोली, चंद्रपूर, दादा भुसे – धुळे, बुलढाणा

मोठ्या प्रमाणात वाढल्या असून, त्याचबरोबर जबाबदारीही अधिक वाढली आहे. या पार्श्वभूमीवर आगामी निवडणुका केवळ पुनरावृत्तीची संधी नसून, आपले वर्चस्व अधिक मजबूत करण्याची आणि पहिल्या क्रमांकावर झेप घेण्याची निर्णायक लढाई म्हणून पाहिली जात आहे. त्यामुळेच पक्षाने यावेळी अधिक आक्रमक, नियोजनबद्ध आणि लक्ष्यकेंद्री रणनीती अवलंबत प्रत्येक स्तरावर विजय सुनिश्चित करण्याचा निर्धार केला आहे.या २२ जिल्ह्यांमध्ये जास्तीत जास्त जिल्हा परिषद गट आणि पंचायत समिती गण जिंकत जिल्हा परिषद अध्यक्ष आणि पंचायत समिती सभापती पदांवर भगवा फडकवणे हे अंतिम लक्ष्य निश्चित करण्यात आले आहे. एकनाथ शिंदे यांनी संपर्क मंत्र्यांना दिलेले आदेशही तितकेच धारदार आहेत. प्रत्येक जिल्ह्यात टार्गेट फिक्स करून निवडणुकीची काटेकोर तयारी करायची, विजयाची टक्केवारी वाढवायची आणि जिंकण्याची क्षमता असलेले उमेदवार शोधून त्यांना पूर्ण ताकद स्थानिक खासदार, आमदार आणि संपर्क प्रमुख यांच्याशी थेट समन्वय साधायचा असे स्पष्ट सांगण्यात आले आहे. इतकेच नव्हे, तर ज्या जिल्ह्यांमध्ये राष्ट्रवादी (अजित पवार गट) किंवा भाजपचे पालकमंत्री आहेत, तिथेही मागे हटायचे नाही शासकीय समित्यांमध्ये आपल्या पदाधिकाऱ्यांना स्थान मिळवून देण्याचे आदेश देण्यात आले आहेत.यासोबतच निधीची बाजूही तितकीच मजबूत ठेवण्यावर भर देण्यात आला आहे. जिल्हा नियोजन (ऊझऊ) मधून जिल्हाप्रमुख, तालुकाप्रमुख आणि शाखाप्रमुख यांना निधी उपलब्ध करून देत स्थानिक पातळीवर पकड मजबूत करण्याचे निर्देश आहेत. प्रशासनावर प्रभाव निर्माण करत लोकप्रतिनिधी आणि कार्यकर्त्यांना वेळोवेळी सहकार्य मिळेल याची खात्री करायची, तसेच शासकीय योजनांचा लाभ थेट तळागाळापर्यंत पोहोचवायचा ही जबाबदारीही स्पष्ट करण्यात आली आहे.

## काय, खरातची बायकोच पलटली!

### पतीने व्यवहार केले, मग पत्नी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२२नाशिक–** शिर्डी येथील जमिनीच्या व्यवहारातून फसवणूक केल्याप्रकरणी फरार असलेल्या कल्पना खरात यांच्या अटकपूर्व जामीन अर्जावर राहाता सत्र न्यायालयात खडाजंगी झाली. सुनावणी दरम्यान अधिकाऱ्यांनी मांडलेल्या एका मुद्द्याने सर्वांचेच लक्ष वेधून घेतले आहे. कल्पना खरात या कुठेही नोकरी करत नाहीत किंवा त्यांचा कोणताही स्वतंत्र व्यवसाय नाही, मग तरीही त्यांच्या बँक खात्यातून तब्बल ७ कोटी रुपयांचे व्यवहार झाले कसे? असा रोखठोक सवाल तपासी अधिकाऱ्यांनी न्यायालयात उपस्थित केला आहे.

कॅप्टन अशोक खरात यांच्यावर गंभीर गुन्हे दाखल झाल्यानंतर शिर्डीतील गोंदकर यांनी जुन्या व्यवहारावरून शिर्डी पोलिसांत तक्रार दाखल केली होती. या प्रकरणात कल्पना खरात या आरोपी असून त्या सध्या फरार आहेत. अटक टाळण्यासाठी त्यांनी न्यायालयात धाव घेतली असून



आज सरकारी पक्ष, फिर्यादी आणि आरोपींच्या वकिलांनी जोरदार युक्तिवाद केला.कल्पना खरात यांचे वकील प्रशांत गिरी यांनी असा युक्तिवाद केला की, फिर्यादीने दीड वर्षानंतर हा गुन्हा केवळ जुन्या व्यवहाराचा फायदा मिळवण्यासाठी केला आहे. व्यवहार झाला तेव्हा कल्पना खरात उपस्थित नव्हत्या. कल्पना खरात यांचे बँक खाते त्यांचे पती अशोक खरातच ऑपरेट करत होते. केवळ त्यांच्या खात्यातून व्यवहार झाले म्हणून त्यांना आरोपी करता येणार नाही. त्यांनी कधीही प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे व्याजाची रक्कम मागितलेली नाही, असे गिरी यांनी कोर्टाला सांगितले. केवळ मुक्तीयार पत्र त्यांच्या नावावर आहे, पतीने केलेल्या गुन्ह्यांशी त्यांचा संबंध नाही, असेही त्यांनी नमूद केले.

## सततच्या पराभवामुळे कदाचित खर्गेंच्या डोक्यावर परिणाम झाला असावा – फडणवीस

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२२मुंबई –** सध्या देशात विधानसभा निवडणुकांची रणधुमाळी सुरू आहे. प्रचाराला वेग आला असून विरोधक आणि सत्ताधाऱ्यांमध्ये आरोप –प्रत्यारोप सुरू आहेत. मात्र त्यातच आता काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याबाबत बोलताना वादग्रस्त विधान केलं आहे. त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना दहशतवादी म्हटलं आहे. ते चेन्नईमध्ये आयोजित पत्रकार परिषदेमध्ये बोलत होते. एआयएडीएमके पक्ष नरेंद्र मोदींसोबत कशी काय युती करू शकतो, ते एक दहशतवादी आहेत, त्यांचा समानतेवर विश्वास नाही असं खर्गे यांनी म्हटलं होतं. दरम्यान खर्गे यांच्या या विधानामुळे आता नवा वाद निर्माण झाला आहे, भाजप नेत्यांकडून मल्लिकार्जुन खर्गे यांच्या या विधानाचा चांगलाच समाचार घेण्यात आला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी खर्गे यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला आहे.सततच्या पराभवामुळे कदाचित काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गेजी यांच्या डोक्यावर परिणाम झाला असावा, त्यामुळे राष्ट्रभक्त, देशभक्त आणि ज्यांनी सुरक्षित व अधुनिक भारत तयार केला, त्या मोदीजींबद्दल त्यांनी अशाप्रकारचे अपशब्द



वापरले आहेत. काँग्रेसची नीतीच राहिली आहे. हा तोच काँग्रेस पक्ष आहे, ज्यांनी मोदीजींना मौत का सौदागर असं म्हटलं होतं. परंतु ते जेव्हा –जेव्हा मोदींवर हल्ला करतात त्या–त्या वेळी जनता त्यांना उत्तर देते आणि त्या–त्या वेळी जनता त्यांना पराभूत करते. देशाच्या पंतप्रधानांबद्दल त्यांनी केलेलं विधान याचा आम्ही निषेध करतो. त्यांनी आपलं वक्तव्य परत घेऊन, जाहीर माफी मागवी अशा प्रकारची मागणी आम्ही या ठिकाणी करतो, असं फडणवीस यांनी म्हटलं आहे.

## परतवाडा प्रकरणात नवा खुलासा; रीलमधील मोबाईल, पिस्टल व थार वाहन जप्त

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.२२परतवाडा**

परतवाडा येथील लैंगिक शोषण प्रकरणात पोलिस तपासात महत्त्वपूर्ण घडामोड समोर आली असून, आरोपी अयान अहमद तन्वीर अहमद याने रील शूट करताना वापरलेले शस्त्र व वाहन पोलिसांनी जप्त केले आहे. या रीलमध्ये दिसणारे दोन पिस्टलसदृश शस्त्र व महिंद्रा थार वाहन हे राजेश रोशन प्रजापती (वय अंदाजे ५०, रा. सावळी दातुरा, ता. अचलपूर) यांच्या मालकीचे असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

यानंतर पोलिसांनी संबंधितांकडून दोन्ही गन तसेच थार वाहन जप्त केले. जप्त करण्यात आलेल्या पिस्टलचा बोअर

### पिस्टल तपासणीसाठी तज्ञांकडे

(व्यास) कमी असल्याचे प्राथमिक तपासात आढळून आले असून, त्याची सखोल तपासणी करण्यासाठी ते तज्ञांकडे पाठविण्यात येणार आहे. अहवालानुसार पुढील कायदेशीर कारवाई केली जाणार असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

दरम्यान, आरोपी अयानने रील शूट करताना वापरलेला मोबाईल फोन विकून टाकल्याचेही उघड झाले आहे. संबंधित मोबाईल खरेदी करणाऱ्या व्यक्तीकडून पोलिसांनी तो ताब्यात घेतला असून, गुन्ह्याच्या तपासासाठी तो जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणाचा तपास सध्या वेगाने सुरू असून, पुढील पुरावे गोळा करण्याचे काम पोलिसांकडून सुरू आहे.



## जुळ्या शहरांत आरोपी अयान ची दिंड काढत जनजागृती

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२२परतवाडा**

परतवाडा–अचलपूर जुळ्या शहरात अल्पवयीन मुलीच्या लैंगिक शोषण व अश्लील व्हिडिओ व्हायरल प्रकरणात मुख्य आरोपी मोहम्मद अयान याच्या अडचणी कायम असून, न्यायालयाने त्याला पुन्हा सात दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. पोलिसांकडून अद्याप ठोस व निर्णायक पुरावे सादर करण्यात अपयश आल्याची नोंद न्यायालयाने केली. त्यामुळे पुढील तपासासाठी व आवश्यक पुरावे गोळा करण्यासाठी पोलिसांना अतिरिक्त वेळ देण्यात आला आहे. या प्रकरणाने संपूर्ण







अमरावती जिल्ह्यात खळबळ उडवली असून, नागरिकांमध्ये संतापाची भावना व्यक्त होत आहे. न्यायालयीन सुनावणीदरम्यान पोलिसांनी तपास सुरू असल्याचे सांगितले, मात्र प्रकरणाची गंभीरता लक्षात घेता ठोस पुरावे सादर करणे अत्यावश्यक असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले. त्यामुळे तपास यंत्रणांवर आता अधिक जबाबदारी आली आहे.

दरम्यान, कोठडीच्या पहिल्याच दिवशी पोलिसांनी आरोपीची परतवाडा व अचलपूर शहरातून दिंड काढत जनजागृती मोहीम राबवली. या कृतीमागील उद्देश नागरिकांमध्ये भीती निर्माण करणे नसून, अशा गुन्ह्यांविरोधात सामाजिक जागरूकता वाढवणे हा असल्याचे पोलिसांनी सांगितले. तसेच या प्रकरणातील पीडित व संभाव्य साक्षीदारांनी पुढे येऊन माहिती द्यावी, असे आवाहनही करण्यात आले.पोलिसांच्या या कारवाईमुळे काही प्रमाणात समाजात चर्चा रंगली असून, गुन्हेगारांना कठोर संदेश देण्याचा प्रयत्न असल्याचे मत व्यक्त होत आहे. मात्र दुसरीकडे, आरोपीची दिंड काढण्याच्या पद्धतीवरही काही सामाजिक व कायदेशीर प्रश्न उपस्थित होत आहेत.

या प्रकरणात डिजिटल पुरावे, मोबाईल डेटा, तसेच संबंधित ठिकाणांवरील माहिती गोळा करण्याचे काम सुरू आहे. तपासाची दिशा निश्चित करण्यासाठी पोलिसांकडून तांत्रिक विश्लेषणालाही महत्त्व दिले जात आहे. आगामी काळात या प्रकरणात आणखी धक्कादायक खुलासे होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

एकूणच, अयान प्रकरणाने केवळ कायदा–सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण केला नसून, समाजातील सुरक्षेच्या दृष्टीनेही गंभीर चिंता निर्माण केली आहे. त्यामुळे या प्रकरणाचा तपास जलद गतीने व पारदर्शकपणे पूर्ण करून दोषींना कठोर शिक्षा देण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

### ‘फंडिंग’च्या मागावर तपास; पडद्यामागचे सूत्रधार लवकरच उघड होणार

या प्रकरणातील तपासाला आता वेग आला असून आरोपींचे बँक व्यवहार आणि संशयास्पद ‘फंडिंग’चे जाळे पोलिसांच्या रडारवर आले आहे. शहरातील आणखी काही पांढरपेशा चेहरे या चौकशीत अडकण्याची शक्यता व्यक्त होत आहे. प्रकरणाची पाळेमुळे खणून काढण्याचा निर्धार पोलिसांनी केला असून, लवकरच या गुन्ह्यामागील पडद्यामागचे खरे सूत्रधारांना बेड्या ठोकले जातील, अशी जोरदार चर्चा पोलीस वर्तुळात रंगू लागली आहे.

## संपादकीय ......

# विदर्भातील रिक्त जागांवर पुन्हा वैदर्भीय चेहरा?

*राजकारणात गणिते जशी स्पष्ट दिसतात, तशीच त्यामागची समीकरणे अनेकदा धूसर असतात. राज्य विधान परिषदेच्या नऊ रिक्त जागांसाठी निवडणूक जाहीर होताच, सत्ताधारी व विरोधकांच्या हालचालींना वेग आला आहे. १२ मे रोजी होणाऱ्या या निवडणुकीसाठी २३ ते ३० एप्रिलदरम्यान उमेदवारी अर्ज दाखल होणार आहेत. संख्याबळाच्या हिशेबाने भाजप पाच, शिवसेना (शिंदे गट) दोन, तर राष्ट्रवादी (अजित पवार गट) आणि महाविकास आघाडी प्रत्येकी एक जागा मिळवू शकतात, असे चित्र स्पष्ट आहे. मात्र, या साऱ्या गणितात विदर्भाचा वाटा आणि प्रतिनिधित्वाचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.*

*विदर्भातील दोन जागा रिक्त झाल्या असल्या, तरी त्या पुन्हा वैदर्भीय नेतृत्वाकडेच जातील का, हा प्रश्न आता केवळ राजकीय न राहता प्रादेशिक अस्मितेशी जोडला गेला आहे. नागपूरचे संदीप जोशी आणि आर्वीचे दादाराव केचे यांच्या कार्यकाळाची मुदत संपल्यानंतर निर्माण झालेली पोकळी ही केवळ व्यक्तींची नसून, विदर्भाच्या आवाजाची आहे. या जागा इतर विभागांकडे वळवल्या गेल्यास, आधीच उपेक्षिततेची भावना बळावण्याची भीती नाकारता येत नाही.*

*भाजपमध्येच या दोन जागांसाठी चुरस वाढताना दिसते. संदीप जोशी यांना पुन्हा संधी द्यावी, असा एक गट आग्रह धरत असताना, नागपूरमधील इतर इच्छुकही सक्रिय झाले आहेत. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या समर्थकांकडूनही प्रयत्न सुरू असल्याच्या चर्चा आहेत. यामुळे स्थानिक विरुद्ध बाह्य, जुने विरुद्ध नवे आणि निष्ठा विरुद्ध संधी अशा अनेक स्तरांवर स्पर्धा रंगताना दिसते.दुसरीकडे, दादाराव केचे यांची कहाणी वेगळीच आहे. विधानसभा निवडणुकीतील बंडखोरीनंतर त्यांना दिलेली विधान परिषदेची संधी ही राजकीय समतोल साधण्याचा प्रयत्न होता. मात्र केवळ १३ महिन्यांचा कार्यकाळ मिळाल्याने त्यांच्या समर्थकांमध्ये नाराजी आहे. केचे पुन्हा संधीच्या प्रतीक्षेत आहेत आणि त्यांनी पक्षश्रेष्ठींना आपली भूमिका स्पष्ट केली आहे. त्यांना दिलेली हमी आणि तिची अर्धवट पूर्तता हा मुद्दाही या निवडणुकीत महत्त्वाचा ठरू शकतो.दरम्यान, संभाव्य नव्या चेहऱ्यांमध्ये माजी खासदार रामदास तडस यांचे नावही पुढे येत आहे. मात्र अंतिम निर्णय पक्षश्रेष्ठींकडेच राहणार असल्याने, स्थानिक आकांक्षा आणि केंद्रीय धोरण यांचा ताळमेळ कसा साधला जातो, हे पाहणे महत्त्वाचे ठरेल.मंगळवारी मुंबईत झालेल्या भाजप कोअर समितीच्या बैठकीत काही नावे चर्चेत आली असली, तरी अंतिम शिक्कामोर्तब दिल्लीत होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. यामुळे विदर्भातील नेत्यांची आशा आणि अनिश्चितता दोन्ही वाढल्या आहेत.या पार्श्वभूमीवर, मूलभूत प्रश्न कायम राहतो–विदर्भातील रिक्त जागा पुन्हा विदर्भालाच मिळणार का? की राजकीय गणितांच्या नावाखाली प्रादेशिक समतोलाला दुय्यम स्थान दिले जाणार? विदर्भ हा केवळ मतदारसंघ नाही, तर स्वतंत्र ओळख आणि अपेक्षांचा प्रदेश आहे. त्या अपेक्षांचा सन्मान राखत निर्णय झाला, तरच या निवडणुकीला खरी अर्थपूर्णता प्राप्त होईल. नाहीतर 'वैदर्भीय चेहरा' हा प्रश्न पुन्हा एकदा अनुत्तरितच राहण्याची शक्यता नाकारता येत नाही.*

# नेरपिंगळाईत पाणी संकट लोकप्रतिनिधींनी लक्ष घालण्याची मागणी

## अप्पर वर्धाचा पुरवठा अपुरा, सात-आठ दिवसांनी मिळते पाणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२नेरपिंगळाई**

परिसरातील पाणी प्रश्नाने आता गंभीर आणि आक्रमक वळण घेतले आहे. पिंगळादेवी गढावरून अप्पर वर्धा धरणाचे पाणी सावरखेड-नेरपिंगळाई मार्गे पुरवले जात असले, तरी प्रत्यक्षात गावकऱ्यांना सात ते आठ दिवसांनीच पाणी मिळत असल्याची परिस्थिती आहे. सध्या केवळ १० ते १२ तास पाणीपुरवठा होत असून तो अत्यंत अपुरा ठरत आहे. त्यामुळे आणखी पाच तास पाणीपुरवठा वाढवून देण्याची मागणी जलप्राधिकरणाकडे करण्यात आली आहे.

उन्हाळ्यामुळे गावातील विहिरी, बोअरवेल यासारखे स्थानिक पाणीस्रोत कोरडे पडल्याने संपूर्ण गावाचा भार अप्पर वर्धा पुरवठ्यावर आला आहे. मात्र, सावरखेड-नेरपिंगळाई मार्गावरील मुख्य जलवाहिनीवर ठिकठिकाणी गळती होत असून एअर व्हॉल्व्हमधून धो धो पाणी वाहत आहे. हजारो लिटर पाणी वाया जात असताना गावात नळ कोरडे राहतात, ही स्थिती संतापजनक ठरत आहे. याशिवाय काही ठिकाणी भटक्या जमातीच्या वस्त्यांमधील लोकं जाणीवपूर्वक जलवाहिनी फोडत असल्याचे प्रकार समोर येत आहे. त्यामुळे पाण्याचा दाब पूर्णपणे कोसळतो आणि शेवटच्या टोकापर्यंत पाणी



पोहोचत नाही. प्रशासनाकडून देखरेख आणि दुरुस्तीच्या बाबतीत होत असलेल्या दुर्लक्षामुळे परिस्थिती अधिकच बिघडली आहे. दरम्यान, या पाणी संकटाला भूतकाळातील निर्णयही कारणीभूत ठरत असल्याची चर्चा आता गावात जोर धरू लागली आहे. मागील पंचवार्षिक योजनेत नया वाठोडा येथे ग्रामपंचायतच्या विहिरीचे काम सुरू करण्यात आले होते; मात्र त्यावेळी तत्कालीन विरोधक आणि सध्याचे सत्ताधारी यांनी विरोध करून हे काम बंद पाडल्याचा आरोप केला जात आहे. त्यावेळी विहीर पूर्ण झाली असती, तर आजची भीषण पाणीटंचाई टळली असती, अशी संतप्त प्रतिक्रिया नागरिकांतून व्यक्त होत आहे. गावातील अनेक भागांत आठवडाभर नळ कोरडे राहतात. महिला, ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुलांनाही पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे. यातच भर म्हणजे एवढ्या अपुऱ्या आणि अनियमित पाणीपुरवठ्यातही ग्रामपंचायत वर्षभराचा पाणी कर वसूल करत आहे. पाणी नाही, पण बिल मात्र पूर्ण, हा कसला न्याय?, असा संतप्त सवाल ग्रामस्थ उपस्थित करीत आहेत. नेरपिंगळाईतील पाणीप्रश्न आता केवळ तांत्रिक बिघाड नसून नियोजनाचा अभाव आहे. दुर्लक्ष आणि निर्णयातील चुका यांचा परिणाम असल्याचे स्पष्ट होत आहे. तातडीने गळती दुरुस्ती, पाणीपुरवठ्यात वाढ, पर्यायी जलस्रोतांची उभारणी आणि जबाबदारी निश्चित करणे अत्यावश्यक झाले आहे, अन्यथा हा जनआक्रोश आणखी भडकण्याची चिन्हे स्पष्ट दिसत आहेत.

१०-१२ तास पाणीपुरवठा होत असला तरी तो अपुरा आहे. आणखी पाच तास वाढवून देण्याची मागणी केली आहे. उन्हाळ्यामुळे इतर सर्व पाण्याचे स्रोत बंद पडल्याने पाणीटंचाई गंभीर झाली आहे. – विनोद मनवर ग्रामविकास अधिकारी.

# मेळघाटातील नद्या एप्रिलमध्येच आटल्या

## वन्यजीवांसमोर पाण्याचे गंभीर संकट

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२मेळघाट –** नैसर्गिक साधनसंपत्तीने नटलेला आणि घनदाट जंगलांनी वेढलेला मेळघाट परिसर सध्या तीव्र पाणीटंचाईच्या छायेत आला आहे. मेळघाट व्याघ्र प्रकल्पाच्या कुशीतून वाहणाऱ्या अनेक प्रमुख नद्या यंदा उन्हाळ्याच्या



सुरुवातीलाच आटताना दिसत असून, पर्यावरणीय ऱ्हासाचे गंभीर संकेत समोर येत आहेत. एप्रिल महिन्यातच नद्यांची पातळी लक्षणीयरीत्या घटल्याने वन्यजीवांसमोर पिण्याच्या पाण्याचा प्रश्न उभा ठाकला आहे.

मेळघाटातून वाहणाऱ्या तापी, गडगा, सिपना, खंडू, खापरा, डवाल, कोकरी आणि तलवार या प्रमुख नद्यांचा समावेश होतो. यापैकी काही नद्या पूर्वी बारमाही म्हणून ओळखल्या जात असताना, यंदा मात्र त्या वेळेआधीच आटल्याचे चित्र दिसून येत आहे. परिणामी, जंगलातील वाघ, बिबट्या, हरणे आणि इतर वन्यप्राणी पाण्याच्या शोधात भटकंती करत असून, मानव-वाघ संघर्ष वाढण्याची भीतीही व्यक्त होत आहे.

स्थानिक वनप्रेमी आणि नागरिकांच्या मते, जंगलातील पाणवठ्यांचे योग्य नियोजन न होणे, अनियंत्रित वृक्षतोड, तसेच बदलते हवामान हे या परिस्थितीमागील प्रमुख कारणे आहेत. दरवर्षी उन्हाळ्यात वनविभागाकडून कृत्रिम पाणवठे निर्माण करण्यासाठी निधी खर्च केला जातो, मात्र प्रत्यक्षात अनेक ठिकाणी हे पाणवठे कोरडेच असल्याची तक्रार नागरिकांकडून केली जात आहे. या पृष्ठभूमीवर भविष्यातील पाणीटंचाई टाळण्यासाठी ठोस उपाययोजनांची गरज अधोरेखित होत आहे. प्रमुख नद्यांवर लहान-मोठे साठवण प्रकल्प, कोल्हापुरी बंधारे उभारणे, जलसंधारणाची कामे गतीने राबविणे आणि नैसर्गिक जलस्रोतांचे पुनरुज्जीवन करणे आवश्यक असल्याची मागणी जोर धरत आहे.

# खोलापूरच्या सरपंचपदाची निवडणूक रद्द

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२खोलापूर** – मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने सरपंचपदाशी संबंधित एका महत्त्वाच्या प्रकरणात अंतरिम दिलासा दिला आहे. याचिकाकर्त्या सरपंच सरला इंगळे यांच्या विरोधातील शासनाचे आदेश तात्पुरते स्थगित केले आहेत. त्यामुळे सरला इंगळे या सरपंचपदी कायम झाल्या असून येथे सरपंचपदाकरिता आयोगाने लावलेली निवडणूक देखील रद्द करण्यात आली आहे. भातकुली तालुक्यातील खोलापूर गावातील अतिक्रमण आणि निधी अपहाराचा ठपका ठेवत अतिरिक्त आयुक्तांनी सरपंच सरला इंगळे यांना अपात्र घोषित केले होते. याविरोधात त्यांनी मंत्र्यांकडे दाद मागितली असता याप्रकरणात ग्रामविकास मंत्र्यांनी १७ फेब्रुवारी २०२६ रोजी त्यांच्या विरोधातच निर्णय दिला होता. त्यामुळे सरला इंगळे यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. यामध्ये ग्रामविकास मंत्र्यांनी




दिलेल्या दोन वेगवेगळ्या आदेशांना आव्हान देण्यात आले होते. न्यायालयाने प्राथमिकदृष्ट्या असे नमूद केले की, मंत्र्यांनी दिलेला आदेश अपिलाचा योग्य निकाल वाटत नाही. तसेच अतिरिक्त आयुक्तांनी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या अहवालावर स्वतंत्र विचार न करता निर्णय घेतल्याचेही दिसून येते. या पार्श्वभूमीवर न्यायालयाने संबंधित सर्व आदेशांना स्थगिती दिली असून प्रकरणाची पुढील सुनावणी २८ एप्रिल रोजी होणार आहे. दरम्यान, थेट सरपंचपदासाठी २८ एप्रिल रोजी जाहीर करण्यात आलेल्या निवडणूक प्रक्रियेलाही न्यायालयाने स्थगिती दिली आहे. पुढील आदेश येईपर्यंत ही प्रक्रिया राबवू नये, असे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत.

# पद्मश्री शंकरबाबा पापळकर यांची चिखलदरा पालिकेला भेट

### नगराध्यक्ष शेख अब्दुल शेख हैदर यांच्याशी विविध मुद्द्यांवर चर्चा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२चिखलदरा,**

पद्मश्री पुरस्काराने सन्मानित समाजसेवक डॉ. शंकरबाबा पापळकर यांनी चिखलदरा नगरपालिकेला भेट देऊन येथील शैक्षणिक व्यवस्था आणि स्थानिक समस्यांचा सखोल आढावा घेतला.

यावेळी त्यांनी नगराध्यक्ष शेख अब्दुल यांनी केलेल्या कामांची प्रशंसा करीत त्यांना खऱ्या समाजसेवेचे उदाहरण असल्याचे सांगितले. डॉ. पापळकर यांनी विशेषतः परिसरातील शिक्षणासंबंधित समस्यांची गांभीर्याने दखल घेतली आणि त्यावर उपाययोजना करण्यासाठी स्वतः पुढाकार घेत योग्य मार्गदर्शन केले.

शिक्षणक्षेत्रात सुधारणा करण्यासाठी सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासनही त्यांनी दिले. याप्रसंगी चिखलदरा नगरपालिकेच्या वतीने नगराध्यक्ष शेख अब्दुल यांनी डॉ. शंकरबाबा पापळकर यांचा सत्कार केला.

विशेष म्हणजे, पद्मश्री पुरस्कार मिळाल्यानंतरचा हा त्यांचा पहिलाच सार्वजनिक सत्कार होता, जो त्यांनी आनंदाने स्वीकारला.

यावेळी पालिकेचे



उपाध्यक्ष प्रमोद नाईक, नगरसेवक रूपेश चौबे, शेख जाहीर, आशु शेख, ज्येष्ठ नागरिक गम्मू गुरुजी, भास्कर हरमकार, शेख जमील आदी उपस्थित होते.

# महाजनपुरा परिसरात उभारणार गरिबांची घरकुले

## पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची माहिती

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२अमरावती,**

घरांना हक्काचे घर मिळावे, या उद्देशाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सुचनेनुसार आणि महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या पुढाकाराने अमरावती जिल्ह्यातील मौजा महाजनपुरा येथील सुमारे पाच एकर जमीन गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळाला (म्हाडा) प्रदान करण्याचा निर्णय आज घेण्यात आला आहे. महसूल व वनविभागाने आज निर्गमित केलेल्या आदेशानुसार, महाजनपुरा (ता. जि. अमरावती) येथील शेत सर्व्हे नं. २०/१ मधील जागा 'प्रधानमंत्री आवास योजना' राबविण्यासाठी मंजूर करण्यात आली आहे. विशेष म्हणजे, ही जागा केवळ एक रुपया प्रति चौरस मीटर या नाममात्र दराने 'भोगवटादार वर्ग-दोन' या धारणाधिकारावर उपलब्ध करून देण्यात आली आहे. जमिनीचा ताबा मिळाल्यापासून तीन वर्षांच्या आत गृहनिर्माणाचे काम सुरू




करणे बंधनकारक राहील. या जमिनीचा वापर केवळ मंजूर प्रकल्पासाठीच (प्रधानमंत्री आवास योजना) करता येईल. अमरावतीच्या जिल्हाधिकाऱ्यानी संबंधित विभागाकडून जमिनीची मोजणी करून घेणे आणि भविष्यात या जागेवर कोणतेही अतिक्रमण होणार नाही, याची दक्षता घेण्याचे निर्देश देण्यात आले.

> महाजनपुरा येथील ही जागा अत्यंत मोक्याच्या ठिकाणी असून, ती नाममात्र दराने उपलब्ध करून देण्यात आली आहे. या जागेवर गृहनिर्माण प्रकल्पाचे काम येत्या तीन वर्षांत सुरू करणे बंधनकारक करण्यात आले असून, बांधकामाचा दर्जा आणि नियोजनाबाबत स्वतः लक्ष देणार आहोत.
> **–चंद्रशेखर बावनकुळे, पालकमंत्री, अमरावती.**

# अमरावती जिल्ह्यात ६२७ रुग्णांना सुमारे ५.२८ कोटींची मदत

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीतून आरोग्यसेवेला गती

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२अमरावती–** शासनाच्या आरोग्यविषयक विविध योजनांमधून मदत न मिळालेल्या पात्र व गरजू रुग्णांसाठी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी 'आधार' ठरत आहे. अमरावती जिल्ह्यात आर्थिक वर्षात ६२७ रुग्णांना सुमारे ५ कोटी २८ लाख रुपयांची वैद्यकीय आर्थिक मदत वितरित करण्यात आली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीतून जिल्हा कक्षाची स्थापना, पेपरलेस अर्ज प्रक्रिया, तातडीने अर्जाचा निपटारा करणे आदी सकारात्मक बदल करण्यात आले. त्यासोबतच सामंजस्य करार, क्राउड फंडिंग आदींच्या माध्यमातून समाजातील मदत करणारे रूग्णालय, धर्मादाय रूग्णालय, संस्था, दाते आदींच्या सहकार्य लाभत आहे.

मुख्यमंत्री सहाय्यता निधीच्या कार्यपद्धतीत केलेल्या सुधारणा आणि मदतीचे विविध मार्ग उपलब्ध करून दिल्याने पारदर्शकता वाढून मदत वितरणाचा वेग लक्षणीयरित्या वाढला आहे. परिणामी, अधिकाधिक पात्र रुग्णांना वेळेत आर्थिक सहाय्य मिळत आहे.




कॉक्लियर इम्प्लांट (वय वर्ष २ ते ६), हृदय, यकृत, किडनी, फुफ्फुस, बोन मॅरो, हाताचे, गुडघ्याचे प्रत्यारोपण, हिप रिप्लेसमेंट, कर्करोग शस्त्रक्रिया, रस्ते अपघात, लहान बालकांची शस्त्रक्रिया, मेंदूचे आजार, हृदयरोग, डायालिसिस, कर्करोग (केमोथेरपी / रेडिएशन), अस्थिबंधन, नवजात शिशुंचे आजार, बर्न (भाजलेले) रुग्ण, विद्युत अपघात रुग्ण या अशा एकूण २० गंभीर आजारांसाठी अर्थसहाय्य दिले जाते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष, बीपीसीएल फाऊंडेशन व टाटा मेमोरियल सेंटर यांच्यात बालकांच्या कर्करोग उपचारासाठी नुकताच सामंजस्य करार करण्यात आला आहे. या करारामुळे सामाजिक दायित्व (सीएसआर) अंतर्गत उपचारांसाठी विशेष निधी उपलब्ध होणार आहे. आर्थिक अडचणी कमी होऊन गरजू बालकांना गुणवत्तापूर्ण कर्करोग उपचार सुलभ होणार आहेत.

१ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२६ या कालावधीत राज्यातील तब्बल ४० हजार ७७६ रुग्णांना ३३३ कोटी ६ लाख ८१ हजार ५०० रुपयांची वैद्यकीय मदत देण्यात आली आहे. तर, याच कालावधीत अमरावती जिल्ह्यातील ६२७ रुग्णांना सुमारे ५ कोटी २८ लाख ४८ हजार रुपयांची आर्थिक मदत वितरित करण्यात आली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकारातून राज्यातील शेकडो गरजू रुग्णांना मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून उपचारासाठी भक्कम आधार मिळत आहे. सुधारित कार्यपद्धती, तातडीने निर्णय आणि समाजाच्या सहभागामुळे मदतीचा लाभ अधिक वेगाने गरजूंपर्यंत पोहोचत आहे. अधिक माहितीसाठी व सहाय्यासाठी रूग्णांनी १८०० १२३ २२११ या टोल-फ्री क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रूग्णालय मदत कक्षाचे कक्ष प्रमुख रामेश्वर नाईक यांनी केले आहे.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाथा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / PDF / वेब – पोर्टल /ई – पेपर

# राळेगावच नव्हे, तर लगतच्या परिसरातील मुलीही बेपत्ता

**भाजप जिल्हाध्यक्ष प्रफुल चौहान यांची माहिती**

**विदर्भ प्रजासत्ता**
**दि.२२यवतमाळ** –बेपत्ता ३४ मुली राळेगावातीलच नव्हे, तर आजूबाजूच्या परिसरातील आहेत. पाच ते सहा महिन्यांपासून हे प्रकरण ट्रॅक करणे सुरू असल्याची माहिती भाजप जिल्हाध्यक्ष ॲड. प्रफुल्ल चौहान यांनी पत्रकार परिषदेत दिली. पुढे बोलताना ते म्हणाले, बेपत्ता मुलींच्या प्रकरणात एक ऑडिओ क्लिप व्हायरल झाली होती. आता त्याच मुलीची दुसरी ऑडिओ क्लिप मिळाली आहे. यामध्ये त्या मुलीने केलेल्या संभाषणातून अनेक व्यक्तींचा सहभाग यात असल्याचे स्पष्ट होत आहे. ही ऑडिओ क्लिपसुद्धा पोलिसांना देण्यात आली आहे. ताब्यात घेण्यात आलेल्या मझहर कुरेशी याच्याविरोधात विविध प्रकारचे गुन्हे दाखल आहेत. यात गो-तस्करी, मुलींची छेडखानी आदी प्रकरणांचा सहभाग आहे. त्याच्या पत्नीचेसुद्धा नाव समोर आले असून, ती मुलींसोबत संपर्क करीत असल्याचे त्यात म्हटले आहे. यासोबत बनावट आधारकार्ड तयार करून त्यात जन्म तारीखसुद्धा बदलविण्यात येत होती. हा प्रकार अतिशय



गंभीर असून, थेट पोलिस ठाण्यात तक्रार दाखल झाली नाही. परंतु प्रकरणाचे गांभीर्य ओळखून तपास करणे आवश्यक आहे. दुसर्‍या ऑडिओ क्लिपमध्ये तिने स्वतःच्या आईच्या नावाचा तसेच इतरही वेगवेगळ्या नावांचा उल्लेख केला आहे. हे व्यक्ती नेमके कोण आहे. मुलीच्या बेपत्ता होण्यामागे लव्ह जिहाद, मानव तस्करी, तसेच इतरही काही प्रकार असण्याची शक्यता आहे. या दृष्टीने पोलिसांनी तपास केल्यास बरेच काही घबाड बाहेर येण्याची शक्यता असल्याचेही ते म्हणाले. पोलिसांनी संभाषण करणार्‍या मुलीच्या आईचे लोकेशन घेण्याचा प्रयत्न केला. एकंदरीत प्रकरणाची व्याप्ती मोठ्या प्रमाणात असून, संभाषणातील संपूर्ण व्यक्तींचा शोध घेतल्यास प्रकरणाचा छडा लागेल, अशी ग्वाही शेवटी जिल्हाध्यक्ष प्रफुल चौहान यांनी दिली. पत्रकार परिषदेत राजू पडगिलवार, रेखा कोठेकर, पुष्पा सप्रे, गजानन भोकरे आदी उपस्थित होते.

## धान्य घोटाळ्यावर प्रशासनाचा दणका

# सहा रेशन दुकानांचे परवाने रद्द

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२अमरावती**
अतिरिक्त रेशन धान्य वाटपातील गंभीर अनियमितते प्रकरणी जिल्हा पुरवठा विभागाने कठोर कारवाई करत सहा रेशन दुकानदारांचे प्राधिकारपत्र कायमस्वरूपी रद्द केले आहे. तसेच संबंधितांकडून अतिरिक्त धान्याची बाजारभावानुसार रक्कम वसूल करण्याचे आदेश जिल्हा पुरवठा अधिकारी निनाद लांडे यांनी दिले आहेत.तहसीलच्या ग्रामीण भागातील तत्कालीन निरीक्षण अधिकारी (आयओ) जितेंद्र पाटील यांनी जानेवारी २०२३ ते



ऑक्टोबर २०२४ या कालावधीत सुमारे ३८७४ क्विंटल अतिरिक्त रेशन धान्य विशिष्ट सात दुकानदारांना वितरित केल्याचे चौकशीत निष्पन्न झाले. यामध्ये सुमारे १.४० कोटी रुपयांचा घोटाळा झाल्याचे समोर आले आहे. याप्रकरणी पाटील यांना यापूर्वीच निलंबित करण्यात आले आहे.नोटीस देऊन खुलासा मागविल्यानंतर तो असमाधानकारक ठरल्याने सहा दुकानदारांवर कारवाई करण्यात आली. दरम्यान, चांदूर बाजार तालुक्यातही ४१३ क्विंटल धान्य वाटप प्रकरण समोर आले असून संबंधित दुकानदारांवर कारवाईची प्रक्रिया सुरू आहे.जिल्हाधिकार्‍यांच्या निर्देशानंतर ही कारवाई करण्यात आली असून प्रशासनाच्या या निर्णयामुळे रेशन व्यवस्थेत पारदर्शकता वाढण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

# आरटीई प्रवेशासाठी ३० एप्रिलपर्यंत मुदतवाढ

## पालकांना दिलासा, आतापर्यंत १२३७ प्रवेश निश्चित

**विदर्भ प्रजासत्ताकदि.२२अमरावती**
आरटीई २५ टक्के प्रवेश प्रक्रियेत निवड झालेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांसाठी दिलासादायक निर्णय घेण्यात आला आहे. प्राथमिक शिक्षण संचालनालयाने प्रवेश प्रक्रियेसाठी १० दिवसांची म्हणजे ३१ एप्रिलपर्यंत मुदत वाढवली आहे. सद्यःस्थितीत जिल्ह्यात २ हजार ६२६ जागांसाठी केवळ १ हजार २३७ प्रवेश निश्चित झाले आहे.जिल्ह्यातील आरटीई प्रवेशासाठी तब्बल ७ हजार ९६० बालकांचे ऑनलाईन अर्ज प्राप्त झाले. २२७इंग्रजी शाळेमध्ये आरटीई अंतर्गत प्रवेश स्वीकारले जाणार आहे. याकरिता पुणे येथे ऑनलाईन सोडत काढण्यात आली. यामध्ये २६२६ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. तितकेच विद्यार्थी प्रतीक्षा यादीत आहेत. या विद्यार्थ्यांची यादी १० एप्रिलला प्रसिद्ध करून प्रत्यक्ष प्रवेशाला सुरूवात करण्यात आली होती. कागदपत्रांची पडताळणी करून प्रवेश निश्चितकरण्याची शेवटची तारीख २० एप्रिल होती.




मात्र आता ही मुदत वाढवून २१ ते ३० एप्रिल २०२६ अशी करण्यात आली आहे. या निर्णयामुळे ज्यांनी अद्याप कागदपत्रे सादर केलेली नाहीत किंवा प्रवेश प्रक्रिया पूर्ण केलेली नाही, अशा पालकांना अतिरिक्त वेळ मिळणार आहे. यासंदर्भात आरटीई प्रवेश पोर्टलवरही आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. जिल्ह्यात आतापर्यंत केवळ १२३७ प्रवेश निश्चित करण्यात आले आहे. त्यामुळे जास्तीत जास्त प्रवेश होण्याच्या उद्देशान शासनाकडू न या प्रक्रियेला मुदतवाढ देण्यात आली आहे.

# राणी रस्त्यावरील शौचालय गैरकृत्यांचे अड्डे

## दुर्लक्षामुळे गंभीर परिणामांची भीती

**विदर्भ प्रजासत्ताकदि.२२पथ्रोट**
अचलपूर तालुक्यात अलीकडेच घडलेल्या संवेदनशील प्रकरणामुळे संपूर्ण देशभर संतापाची लाट उसळलेली असताना, गावपातळीवर सुरू असलेल्या काही प्रकारांकडे अजूनही दुर्लक्ष होत असल्याचे चित्र समोर येत आहे. राणी रस्त्यावरील सार्वजनिक शौचालय परिसरात वाढत चाललेल्या आक्षेपार्ह हालचालींमुळे भविष्यात गंभीर परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.बसस्थानकावरून आर्य समाज मंदिर मार्गे गावात जाणाऱ्या मुख्य रस्त्याच्या समांतर असलेला राणी रस्ता हा महामार्गाशी जोडणारा महत्त्वाचा मार्ग आहे. आरोग्य मंदिराजवळून खेकडा नाल्यापर्यंत जाणारा हा रस्ता वाहतुकीसाठी मोठ्या प्रमाणावर वापरला जातो. मात्र, सध्या या रस्त्याची ओळख वेगळ्याच कारणांमुळे होत असून, दिवस-रात्र येथे संशयास्पद हालचाली वाढल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे.पूर्वी या ठिकाणी महिलांची उघड्यावर शौचाची समस्या होती. नंतर शासनाच्या योजनेंतर्गत घरोघरी शौचालये बांधली गेल्याने परिस्थितीत सुधारणा झाली. याच दरम्यान ग्रामपंचायतीने सार्वजनिक शौचालय उभारले होते. काही वर्षांपूर्वी या इमारतीचे नूतनीकरण करून महिलांसाठी तीन युनिट्सची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली. मात्र, सुरुवातीलाच पाण्याची टाकी चोरीला गेल्याने पाणीपुरवठा बंद झाला आणि शौचालयाचा वापर हळूहळू थांबला.याच



दुर्लक्षाचा फायदा घेत काही असामाजिक प्रवृत्तीच्या लोकांनी या जागेचा गैरवापर सुरू केल्याचे समोर आले आहे. सध्या या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर आक्षेपार्ह वस्तूंचा साठा आढळून येत असून, येथे सुरू असलेल्या गैरकृत्यांची गंभीरता स्पष्ट होते. स्थानिकांनी याकडे अनेकदा लक्ष वेधले असले तरी ठोस कारवाईचा अभाव दिसून येत आहे.विशेषतः पालकांच्या दुर्लक्षामुळे युवक-युवती अशा ठिकाणी वावरताना दिसत असल्याचेही समोर आले आहे. काहीजण ओळख टाळण्यासाठी चेहरा झाकून फिरत असल्याने परिस्थिती अधिक चिंताजनक बनली आहे. अलीकडील घटनांचा विचार करता, वेळेत उपाययोजना न केल्यास हे प्रकार कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण करू शकतात.त्यामुळे संबंधित प्रशासनाने तात्काळ लक्ष घालून या ठिकाणाची स्वच्छता, सुरक्षा आणि देखरेख वाढवावी, तसेच नागरिकांनीही सजग राहून अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी पुढाकार घेणे गरजेचे असल्याची मागणी होत आहे.-

# भगवान परशुरामांच्या विचारांचा वारसा जपावा- आमदार सुलभा खोडके

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२अमरावती–** 'भगवान परशुराम हे अन्यायाविरुद्ध लढणारे ऋषी म्हणून इतिहासात अजरामर झाले आहेत. त्यामुळे त्यांच्या विचाराचा वारसा चालविण्याची जबाबदारी तरुण पिढीवर आहे,' असे प्रतिपादन आमदार सुलभा खोडके यांनी केले आहे.



भगवान परशुराम यांची जयंती दरवर्षी वैशाख शुक्ल तृतीयेला म्हणजेच अक्षय्य तृतीयेला साजरी केली जाते. त्यानिमित्त येथे शोभायात्रा काढण्यात आली होती. या शोभायात्रेत त्यांच्यासह विधान परिषद सदस्य संजय खोडके व इतर मान्यवरही सहभागी झाले होते. आमदार खोडके पुढे म्हणाल्या, भगवान परशुरामांनी भगवान शिवशंकरांची कठोर तपश्यचर्या करुन अनेक दिव्य अस्त्रे आणि विद्या आत्मसात केल्यात. परशुराम हे '' अष्टचिरंजीवी ' पैकी ( अमर ) एक मानले जातात. त्यांचे मूळ नाव ' राम ' होते, परंतू भगवान शिवाने दिलेला 'परशु ' या शस्त्रामुळे त्यांना ' परशुराम ' ( परशु धारण करणारे राम ) म्हटले गेले. भगवान परशुराम हे हिंदू धर्मातील एक प्रमुख दैवत असून, त्यांना भगवान विष्णुचा सहावा अवतार मानले जाते. ते माता रेणुका आणि ऋषी जमदग्नी यांचे चिरंजीव होते. ज्यांनी पित्याची आज्ञा शिरसावंद्य मानून ती आज्ञापालन करण्यासाठी कठोर पाऊल उचलले होते, अशी कथा सांगितली जाते.

भगवान परशुराम जन्मोत्सवानिमित्तची शोभायात्रा ज्यावेळी राजकमल चौकात आली, त्यावेळी खोडके दाम्पत्याच्या हस्ते विधीवत पूजन करण्यात आले. आमदार सुलभा खोडके व आमदार संजय खोडके यांनी भगवान परशुराम यांच्या प्रतिमेस वंदन - पूजन - नमन करीत माल्यार्पण केले.भगवान परशुराम, गोमातेच्या सन्मानार्थ काढलेल्या शोभायात्रेत सहभाग नोंदविणाऱ्या सर्वांना त्यांनी शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी अखिल भारतीय ब्राम्हण महासंघ, श्री गौरक्षण संस्था, श्री गौ सन्मान रक्तदान समिती, श्री माहेश्वरी पंचायत, श्रीरामचरितमानस परिषद, अमरावती रक्तदान समिती आणि आयोजनातील इतर समित्यांचे पदाधिकारी व सदस्ये या वेळी मोठ्या संख्येने उपस्थित असल्याचे दिसून आले.



# शेगावातील वाटिका चौकात भीषण आग

## सिलेंडर स्फोटामुळे सात दुकाने भस्मसात

**विदर्भ प्रजासत्ताकदि.२२ शेगाव–** बुलढाणा जिल्ह्यातील शेगाव शहरातील वाटिका चौक परिसरात सायंकाळच्या सुमारास भीषण आग लागून सात दुकाने जळून खाक झाल्याची घटना घडली. या आगीत दोन गॅस सिलेंडरचा स्फोट झाल्याने आग अधिक भडकली आणि मोठे नुकसान झाले.

मिळालेल्या माहितीनुसार, शेगाव शहरातील वाटिका चौक येथे एका खाजगी जागेमध्ये लहान व्यावसायिकांसाठी दुकाने उभारण्यात आली होती. दुपारी सुमारे चार वाजताच्या दरम्यान अचानक एका दुकानातून आग लागली. सुरुवातीला ही आग लहान प्रमाणात असली तरी काही वेळातच दोन सिलेंडरचा स्फोट झाला. स्फोटामुळे आगीने भीषण रूप धारण केले आणि एका लाईनमधील सात दुकाने पूर्णपणे जळून भस्मसात झाली.घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दल घटनास्थळी दाखल झाले आणि आग आटोक्यात आणण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले. स्थानिक नागरिकांनीही आग विझविण्यास मदत केली.या आगीत लाखो रुपयांचे नुकसान झाल्याची प्राथमिक माहिती समोर येत असून सुदैवाने जीवितहानी झाल्याचे वृत्त नाही. आगीचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून संबंधित यंत्रणा पुढील तपास करत आहे.

# विदर्भाचे 'नंदनवन' चिखलदरा सज्ज वाढत्या पर्यटनासाठी महावितरण सतर्क

## वसुंधरा दिनी वृक्षारोपणातून पर्यावरण संवर्धनाचा संदेश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२अमरावती,**
सातपुड्याच्या कुशीत वसलेले चिखलदरा हे विदर्भाचे 'नंदनवन' म्हणून ओळखले जात असून, वाढत्या पर्यटनामुळे येथे पायाभूत सुविधांची गरज अधिक अधोरेखित होत आहे. पर्यटकांची वाढती संख्या लक्षात घेता अखंड वीजपुरवठा सुनिश्चित करण्यासाठी महावितरणने सज्ज राहावे, असे निर्देश महावितरणचे संचालक राजेंद्र पवार यांनी दिले.अचलपूर दौऱ्यादरम्यान त्यांनी चिखलदरा येथील महावितरण कार्यालयाला भेट देत कामकाजाचा सविस्तर आढावा घेतला. दुर्गम भागातील वीजपुरवठ्यात येणाऱ्या अडचणी तातडीने दूर करण्यासाठी ठोस उपाययोजना राबवाव्यात, अशा सूचना त्यांनी अधिकाऱ्यांना दिल्या. चिखलदरा हे राज्यातील प्रमुख पर्यटनस्थळ म्हणून उदयास येत असल्याने येथे मजबूत



पायाभूत सुविधा उभारण्यावर भर देण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.यावेळी महावितरणच्या स्थापत्य विभागासोबत विश्रामगृहाच्या प्रस्तावित आराखड्यावरही चर्चा झाली. भविष्यात स्काय वॉकसारखे प्रकल्प साकार होण्याची शक्यता लक्षात घेऊन पर्यटनवाढीस पूरक सुविधा विकसित करण्याचे निर्देश देण्यात आले. त्यामुळे चिखलदऱ्याचे पर्यटन महत्त्व आणखी वाढण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली.दरम्यान, २२ एप्रिल रोजी जागतिक वसुंधरा दिनानिमित्त चिखलदरा येथील विश्रामगृह परिसरात संचालक पवार यांच्या हस्ते ११ आंबा व ११ फणसाच्या झाडांचे वृक्षारोपण करण्यात आले. अचलपूर विभागीय कार्यालयातही वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला.या प्रसंगी कार्यकारी अभियंता प्रदीप अंधारे, शशांक पोंक्षे, प्रशांत फुटाने, प्रमोद खंडारे, उमेश राठोड, संजय दातीर यांच्यासह महावितरणचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# निकृष्ट कामांचा फटका जनतेला; मेळघाटात 'आर.आर.' घोटाळ्याची चर्चा

## अधिकाऱ्यांच्या निष्क्रियतेमुळे योजनांचा बोजवारा; स्थानिकांमध्ये संताप

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२अमरावती–**
मेळघाटातील आदिवासी बहुल दुर्गम पट्ट्यात पाणीपुरवठ्याच्या नावाखाली कोट्यवधी रुपयांचा अक्षरशः 'रतीब' घातला जातोय; पण प्रत्यक्षात नागरिकांच्या हाती येतेय ती फक्त कोरडी आश्वासने आणि टंचाईची झळ !

शासनाच्या 'आर.आर.' योजनांचा डंका कागदोपत्री वाजत असताना जमिनीवर मात्र या योजनांची अवस्था ढिसाळ, अधांतरी आणि संतापजनक असल्याचे भीषण वास्तव उघड झाले आहे.

ग्रामीण भागाला शाश्वत पाणीपुरवठा देण्याच्या गाजावाज्यात विहिरी, जलकुंभ, पाइपलाईन यांसारखी कामे मोठ्या प्रमाणावर सुरू झाली; पण या कामांचा दर्जा इतका निकृष्ट की अनेक ठिकाणी पाइपलाईन गळक्या, जोडण्या अपूर्ण आणि संपूर्ण यंत्रणा निष्प्रभ ठरली आहे. कागदोपत्री 'पूर्ण' दाखवलेले प्रकल्प प्रत्यक्षात अर्धवट अवस्थेत धूळ खात पडले आहेत.

परिणामी, उन्हाळ्याच्या तोंडावरच मेळघाटात भीषण पाणीटंचाईचे संकट डोके वर काढत आहे. हिराबंबई, राणापीसा, गडगा मालुर, मान्सुधावडीसह इतर तब्बल ४२ गावांमध्ये 'विकास' नावाचा हा दिखावा सुरू आहे.

उंचच उंच जलकुंभ उभारले गेले, पण त्यातून पाणी मात्र नागरिकांच्या घरापर्यंत पोहोचत नाही, हीच या योजनांची शोकांतिका! काही ठिकाणी टाक्या तयार; पण वितरण लाईनच नाही, तर काही ठिकाणी पाइपलाईन टाकूनही पाणीपुरवठा सुरू करण्याची कोणतीही कार्यवाही नाही. म्हणजेच 'काम पूर्ण' हा फक्त कागदावरचा खेळ ठरतोय.दरम्यान, पाण्यासाठी महिलांना मैलोनमैल पायपीट करावी लागत असून, लहान मुलांसह कुटुंबांचा दिवस 'पाण्याच्या शोधात'च जात आहे. कोट्यवधींचा निधी खर्चुनही नागरिकांना पाण्याच्या एका घोटासाठी संघर्ष करावा लागणे, ही प्रशासनाच्या निष्काळजीपणाची आणि अपयशाची जिवंत साक्ष आहे.

या सगळ्या प्रकारामागे निकृष्ट दर्जाचे बांधकाम, कंत्राटदारांची मनमानी, आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे संबंधित विभागातील अधिकाऱ्यांचीढिसाळ देखरेख व संशयास्पद भूमिका असल्याचा आरोप स्थानिकांकडून होत आहे. 'काम सुरू बिल मंजूर, मात्र फाईल बंद' या चक्रात जनतेच्या हक्काचा पैसा अक्षरशः गिळंकृत होत असल्याची चर्चा रंगू लागली आहे. योजना कागदावरच पूर्ण होतात; आमच्या गावात मात्र आजही पाणी येत नाही, असा संतप्त सवाल ग्रामस्थांनी उपस्थित केला आहे.

शासनाच्या गाजावाज्याच्या घोषणांना मेळघाटात वास्तवाचा चपराक बसत असल्याचे चित्र आहे. आता तरी या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून दोषी अधिकाऱ्यांवर कडक कारवाई करावी, निकृष्ट कामांची चौकशी करून कंत्राटदारांना काळ्या यादीत टाकावे आणि सर्व अपूर्ण प्रकल्प तातडीने पूर्ण करून पाणीपुरवठा सुरू करावा, अशी तीव्र मागणी जोर धरत आहे. अन्यथा 'कोट्यवधींचा विकास' हा शब्द मेळघाटासाठी केवळ उपहासाचा विषय ठरणार, यात शंका नाही.-



# रिलच्या झगमगाटीत छायाचित्रकार धोक्यात

## कॅमेरा विकण्याची वेळ; मोबाइलने व्यवसाय हिरावला

**अरुण जोशी**

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२२अमरावती –** कधीकाळी लोकांच्या आयुष्यातील सुंदर क्षण कॅमेर्!यात कैद करणारा छायाचित्रकारांचे बदलत्या रिल ट्रेंडने स्वतःच्या आयुष्याचेच चित्र धूसर होताना दिसत आहे. वाढत्या सोशल मीडियाच्या ‘रिल’ ट्रेंडने पारंपरिक फोटोग्राफी व्यवसायावर अक्षरशः घाला घातला असून, मोबाईलमधील आलेले स्मार्ट फीचर्स, वाढती हौशी छायाचित्रकार संख्यामुळे मुख्य व्यावसायिक छायाचित्रकाराचा व्यवसाय डबघाईस आला आहे. फोटोग्राफरांच्या व्यवसायावर अवलंबून असलेल्या व उदरभरण करणार्!या छायाचित्रकारांच्या डोळ्यातील वेदना आता शब्दांत मांडता येत नाहीत असे मत अंबानगरी फोटोग्राफर असोसिएशनचे माजी अध्यक्ष मनीष जगताप यांनी व्यक्त केले.

गेल्या चार ते पाच दशकांपासून छायाचित्र कलेच्या माध्यमातून लोकांच्या आनंदाचे क्षण जपले. परंतु आज आमच्याच आनंदावर विरजण पडले, अशा शब्दांत ठाकरे यांनी आपली व्यथा व्यक्त केली. पूर्वी लग्नसमारंभ, वाढदिवस असो किंवा एखादा छोटासा कार्यक्रम असो फोटोग्राफरशिवाय तो अपूर्ण वाटायचा. आज मात्र, प्रत्येकाच्या हातात मोबाईल आला आणि त्या मोबाईलनेच आमचा व्यवसाय हिरावून घेतला. त्यात आत्ता आलेली ‘रिल’ यात छायाचित्रकार बांधवांचे आर्थिक कंबरडे मोडले. रिल बनवण्याच्या नादात लोकांना आता प्रोफेशनल फोटोग्राफीची किंमत उरलेली



नाही. काही सेकंदांच्या सोशल मीडियावरील प्रसिद्धी व्हिडिओ काढण्यासाठी हजारो नको ती प्रयत्न करतात. परंतु आयुष्यभर जपता येतील असे दर्जेदार फोटो, व्हिडिओ काढणार्!या फोटोग्राफरकडे मात्र, कोणी वळूनही पाहत नाही ही शोकांतिका आहे. हा बदल केवळ व्यवसायावर नाही, तर अनेक कुटुंबांच्या उदरनिर्वाहावर घाला घाला आहे. अनेक अनुभवी फोटोग्राफर आज कामाच्या प्रतीक्षेत दिवस काढत आहेत. कॅमेर्!याच्या लेन्समधून जग पाहणार्!या या कलाकारांच्या डोळ्यांत आता चिंता आणि असुरक्षिततेचे सावट दाटले आहे. ज्येष्ठ छाया चित्रकारावर कॅमेरा विकण्याची वेळ आल्याचे सांगताना त्यांचा आवाज दाटून येत होता .काढण्यासाठी हजारो नको ती प्रयत्न करतात. परंतु आयुष्यभर

### समाजाने कलेची दखल घ्यावी

फोटोग्राफरांच्या मते खरी गरज आहे ती समाजाने त्यांच्या कलेची पुन्हा कदर करण्याची. आज ‘रिल’च्या काही सेकंदांच्या प्रसिद्धीसाठी धावणार्!या जगाने, त्या फोटोग्राफरच्या डोळ्यात डोकावून पाहायला हवे. जो शांतपणे आपल्या अस्तित्वासाठी झगडत आहे. असे मत प्रेस फोटोग्राफर असोसिएशनचे माजी अध्यक्ष वैभव दलाल, विद्यमान अध्यक्ष मनीष तसरे यांनी व्यक्त केले.

जपता येतील असे दर्जेदार फोटो, व्हिडिओ काढणार्!या फोटोग्राफरकडे मात्र, कोणी वळूनही पाहत नाही ही शोकांतिका आहे. हा बदल केवळ व्यवसायावर नाही, तर अनेक कुटुंबांच्या उदरनिर्वाहावर घाला घाला आहे. अनेक अनुभवी फोटोग्राफर आज कामाच्या प्रतीक्षेत दिवस काढत आहेत. कॅमेर्!याच्या लेन्समधून जग पाहणार्!या या कलाकारांच्या डोळ्यांत आता चिंता आणि असुरक्षिततेचे सावट दाटले आहे. ज्येष्ठ छायाचित्रकारावर कॅमेरा विकण्याची वेळ आल्याचे सांगताना त्यांचा आवाज दाटून येत होता.

# माजी सरन्यायाधीश भूषण गवई सहकुटुंब बागेश्वर धाममध्ये; धीरेंद्र कृष्ण शास्त्रींची घेतली भेट

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२२नागपूर : –** धीरेंद्र कृष्ण शास्त्री, ज्यांना लोकप्रियपणे ‘बागेश्वर बाबा’ म्हणून ओळखले जाते, हे मध्यप्रदेशातील छतरपूर जिल्ह्यातील बागेश्वर धामचे प्रमुख आहेत. ते आपल्या कथाकथन शैलीतून धार्मिक प्रवचन देतात आणि विशेषतः ‘दरबार’ या कार्यक्रमांमुळे चर्चेत आले आहेत, ज्यामध्ये ते भक्तांच्या समस्या जाणून त्यावर उपाय सुचवतात असा दावा केला जातो.त्यांच्या कार्यक्रमांना मोठ्या प्रमाणावर गर्दी होते आणि सोशल मीडियावरही त्यांची मोठी लोकप्रियता आहे. तथापि,



त्यांच्या चमत्कारांच्या दाव्यांवरून वादही निर्माण झाले असून अंधश्रद्धा आणि वैज्ञानिक दृष्टिकोन यावर चर्चा रंगताना दिसते. माजी सरन्यायाधीश भूषण गवई यांनी अलीकडेच मध्यप्रदेशातील बागेश्वर धाम येथे भेट दिल्याची माहिती समोर आली आहे. आपल्या कुटुंबासह त्यांनी येथे दर्शन घेतले असून, धामाचे प्रमुख धीरेंद्र कृष्ण शास्त्री यांच्याशी संवाद साधला. यावेळी गवई यांनी बागेश्वर धाममार्फत चालविल्या जाणाऱ्या सामाजिक उपक्रमांचे कौतुक केले आणि श्रद्धा व समाजसेवा यांचा संबंध अधोरेखित केला. या भेटीमुळे बागेश्वर धाम पुन्हा एकदा चर्चेत आले आहे. दर्शनानंतर गवई कुटुंबीयांनी बागेश्वर धामचे प्रमुख धीरेंद्र कृष्ण शास्त्री यांची भेट घेऊन त्यांचा आशीर्वाद घेतला. यावेळी बागेश्वर सरकार यांनी त्यांना बालाजी भगवानांचे पवित्र चित्र भेटस्वरूप दिले. सुमारे अर्धा तास चाललेल्या या विशेष भेटीत आध्यात्मिक विषयांवर चर्चा करण्यात आली.याशिवाय, बागेश्वर धाममध्ये चालविण्यात येणाऱ्या गुरुकुल तसेच विविध सामाजिक व धार्मिक प्रकल्पांबाबतही सविस्तर संवाद झाला. गवई यांचा हा बागेश्वर धामचा पहिलाच दौरा नसून, यापूर्वीही आपल्या कार्यकाळात त्यांनी येथे अनेकदा दर्शनासाठी भेट दिली होती. यावरून त्यांच्या या स्थळावरील दृढ श्रद्धेची प्रचिती येते.

### ‘एक्स’वरून दिली माहिती

भारताचे सर्वोच्च न्यायालयाचे माजी सरन्यायाधीश भूषण गवई यांनी सोमवारी सायंकाळी आपल्या पत्नी तेजस्विनी गवई आणि पुत्र ज्योतिरादित्य गवई यांच्यासह मध्यप्रदेशातील बागेश्वर धाम येथे भेट दिली. याबाबत स्वतः बागेश्वर धाम यांच्या एक्स अकाऊंट वरून माहिती देण्यात आली.त्यांनी कुटुंबासह बागेश्वर बालाजीचे दर्शन घेऊन पूजन-अर्चन केले.

# औषधी विक्रेत्यांवर ‘एफडीए’चा बडगा; ३९ जणांवर कारवाई

## १०५ मेडिकल स्टोअर्सची तपासणी; ३९ परवाने निलंबित, ३ कायमचे रद्द

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२२अमरावती :** जिल्ह्यात औषध विक्रीतील नियमांचे पालन होत आहे की नाही, यावर लक्ष ठेवण्यासाठी अन्न व औषध प्रशासन (एफडीए) विभागाने एप्रिल २०२५ ते मार्च २०२६ या कालावधीत व्यापक तपासणी मोहीम राबवली. या मोहिमेदरम्यान एकूण १०५ मेडिकल स्टोअर्सची तपासणी करण्यात आली असून, नियमांचे उल्लंघन करणाऱ्या औषधी विक्रेत्यांवर कठोर कारवाई करण्यात आली आहे.तपासणीदरम्यान विविध त्रुटी आढळून आल्यामुळे ३९ औषध विक्रेत्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली. त्यापैकी ३९ जणांचे परवाने निलंबित करण्यात आले असून, गंभीर स्वरूपाच्या अनियमितता आढळल्याने ३ परवाने थेट रद्द करण्यात आले. या कारवाईमुळे औषध व्यवसायात खळबळ उडाली आहे.याशिवाय औषध निरीक्षकांनी ३५ मेडिकल स्टोअर्समधून औषधांचे नमुने तपासणीसाठी घेतले होते. त्यापैकी एका नमुन्यात अप्रमाणित औषध आढळून आले. या संपूर्ण कारवाईदरम्यान सुमारे १ लाख १४ हजार रुपयांचा औषध साठा जप्त करण्यात आला असून, संबंधित प्रकरणे न्यायालयात दाखल करण्यात आली आहेत.तपासणीत काय पाहिले जाते?एफडीएतर्फे औषध दुकानांची तपासणी करताना परवान्याची वैधता, फार्मासिस्टची उपस्थिती, औषधांची एक्सपायरी डेट, साठवणूक पद्धती, प्रिस्क्रिप्शनशिवाय विक्री, प्रतिबंधित औषधांची बेकायदेशीर विक्री, बिलिंग व नोंदवही तसेच तापमान नियंत्रित साठवणूक या बाबींवर विशेष लक्ष दिले जाते.नागरिकांनी सतर्क राहावेतज्ज्ञांच्या मते, औषध खरेदी करताना ग्राहकांनी नेहमी बिल घ्यावे, औषधांची एक्सपायरी तपासावी आणि डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय औषध सेवन करू नये, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.सहायक आयुक्त (औषधी) डॉ. ए. मा. माणिकराव यांनी सांगितले की, नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर नियमितपणे कारवाई सुरूच राहणार आहे.दरम्यान, एप्रिल २०२४ ते मार्च २०२५ या कालावधीत १६१ औषध दुकाने तपासण्यात आली होती. त्यावेळी ३० परवाने निलंबित करण्यात आले होते, तर ६ परवाने रद्द करण्यात आले होते. यावरून एफडीएने कारवाईची कडक भूमिका कायम ठेवली असल्याचे स्पष्ट होत आहे.

# प्रशासनाच्या दुर्लक्षाला ग्रामस्थांचा चपराक

## लोकवर्गणीतून बोअरवेल उभारून पाणीटंचाईवर मात

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२२मेळघाट–** मेळघाटातील बोरदा गावात निर्माण झालेल्या तीव्र पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर ग्रामस्थांनी प्रशासनाच्या उदासीनतेला जणू ठोस उत्तर दिले आहे. वारंवार तक्रारी करूनही कोणतीही ठोस कार्यवाही न झाल्याने अखेर गावकऱ्यांनी स्वखर्चाने लोकवर्गणी गोळा करून बोअरवेलची खुदाई केली. या प्रयत्नांना यश मिळत बोअरवेलमध्ये मुबलक पाणी लागले असून गावकऱ्यांच्या चेहऱ्यावर समाधान झळकले.या बोअरवेलच्या यशस्वी उभारणीनंतर ग्रामस्थांनी आदिवासी परंपरेनुसार महापूजा करून जलस्रोताचे स्वागत केले. हा उपक्रम केवळ पाण्याच्या समस्येवर उपाय नसून, स्थानिक आदिवासी समाजाच्या स्वावलंबनाचे प्रतीक ठरला आहे.ग्रामस्थांच्या या कृतीमुळे शासन आणि प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले असून, ही बाब संबंधित यंत्रणेसाठी जणू एक ‘कडक चपराक’ मानली जात आहे. शासनावर अवलंबून न राहता स्वतःच्या गरजा पूर्ण करण्याची क्षमता स्थानिकांमध्ये असल्याचे या घटनेतून स्पष्ट झाले आहे.या प्रसंगी युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राहुल येवले यांना विशेष निमंत्रित करण्यात आले होते. त्यांच्या हस्ते बोअरवेलचे उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमाला छन्नु भैया, लालाजी कासड़ेकर, सज्जु भैया, कज्जु कासड़ेकर, सोमा कासड़ेकर यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.गावकऱ्यांच्या एकजुटीमुळे उभारलेला हा उपक्रम आता इतर गावांसाठीही प्रेरणादायी ठरत आहे.

# सोयाबीनला ‘सोन्याचे’ दिवस

## दर हमीभावापार, ५५०० रुपयांचा उच्चांक

### तेल दरवाढ, डीओसीला उठाव आणि आवक घटल्याचा परिणाम; साठवणूकदार शेतकऱ्यांना दिलासा

**विदर्भ प्रजासत्ताकदि.२२ अमरावती**

तेलाच्या दरात झालेली वाढ, पशुखाद्यासाठी लागणाऱ्या सोयापेंड (डीओसी)ला आलेली मागणी आणि बाजारात आवक घटल्याने सोयाबीनच्या दरात मोठी उसळी दिसून येत आहे. सोमवारी येथील कृषी उत्पन्न बाजार समितीत सोयाबीनला प्रति क्विंटल तब्बल ५५०० रुपयांचा उच्चांक मिळाला. विशेष म्हणजे हा दर यंदाच्या ५३२८ रुपयांच्या हमीभावापेक्षा अधिक असल्याने शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.यावर्षी पावसाळ्यात सरासरीपेक्षा जास्त पाऊस आणि काही भागात अतिवृष्टी झाल्याने सोयाबीन पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. अनेक ठिकाणी शेतात पाणी साचल्याने उत्पादन घटले. परिणामी बाजारात सोयाबीनची आवक कमी झाली. उत्पादन घट आणि मागणी वाढ यामुळे दर वाढण्याची शक्यता शेतकऱ्यांनी व्यक्त केली होती. मात्र हंगामाच्या सुरुवातीला बाजारभाव ४५०० रुपयांवर स्थिर राहिल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजी होती.दरम्यान, आर्थिक अडचणीमुळे अनेक शेतकऱ्यांना कमी भावातच सोयाबीन विक्री करावी लागली. तर काही शेतकऱ्यांनी दरवाढीच्या अपेक्षेने साठवणूक केली होती. सध्या दरात झालेल्या वाढीमुळे साठवणूक केलेल्या शेतकऱ्यांना काहीसा दिलासा मिळत असला, तरी अशा शेतकऱ्यांची संख्या मर्यादित असल्याचे चित्र आहे.दरवाढीमागे अनेक कारणे पुढे येत आहेत. या महिन्यात खाद्यतेलाच्या दरात मोठी वाढ झाल्याने सोयाबीनची मागणी वाढली आहे. त्याचबरोबर पशुखाद्यासाठी वापरल्या जाणाऱ्या सोयापेंडचे दरही ४२०० ते ४३०० रुपये क्विंटलपर्यंत पोहोचले आहेत. त्यामुळे प्रक्रिया उद्योगांकडून सोयाबीनची खरेदी वाढली आहे. पावसाळ्यापूर्वी तेल गिरण्या आणि प्लांटद्वारे सोयाबीनची खरेदी



५७०० रुपये क्विंटलपर्यंत होत असल्याची माहिती व्यापाऱ्यांनी दिली आहे.याशिवाय, शासनाकडून नाफेडची खरेदी केंद्रे उशिरा सुरू झाल्याने सुरुवातीच्या टप्प्यात शेतकऱ्यांना अपेक्षित आधार मिळाला नाही. परिणामी अनेकांना कमी दरात विक्री करावी लागली. आता मात्र बाजारात मागणी वाढल्याने दरात सुधारणा दिसून येत आहे.खरीप हंगामाच्या तोंडावर सोयाबीनच्या दरात झालेली ही वाढ शेतकऱ्यांसाठी सकारात्मक संकेत मानली जात आहे. मात्र उत्पादन घट आणि मर्यादित साठा यामुळे सर्वच शेतकऱ्यांना या दरवाढीचा फायदा होईलच असे नाही. आगामी काळात बाजारातील मागणी, हवामान आणि निर्यात स्थितीवर सोयाबीनच्या दराची दिशा अवलंबून राहणार असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे.

# गणोरी येथे सोने चमकविण्याच्या नावावर सव्वादोन लाखांनी फसवणूक

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२२अमरावती –** सोने चमकवून देतो, अशी बतावणी करून दोघांनी एका महिलेची तब्बल सव्वादोन लाखांनी फसवणूक केल्याची घटना गणोरी येथे घडली. संबंधित महिला घरी असताना दोन व्यक्ती त्यांच्या घरी आले. सोने व चांदीचे दागिने चमकवून देण्यासाठी आमच्याकडे विशिष्ट पावडर आहे, तुमचे दागिने चमकवून देतो, असे सांगून त्यांनी महिलेला दागिने देण्यास सांगितले. संबंधित महिलेने २० ग्रॅमचा सोन्याचा गोफ, २० ग्रॅमचे सोन्याचे मणी असलेली पोत, पाच ग्रॅमची सोन्याची अंगठी, असा दोन लाख २५ हजार रुपायांचा मुद्देमाल त्या दोन भामट्यांना दिला. त्यांनी एका भांड्यात हे दागिने टाकून त्यात पावडर टाकली व गॅसवर भांडे ठेवण्यास सांगितले. तोपर्यंत आम्ही दुसऱ्यांना पावडर देऊन येतो, असे ते म्हणाले व दोघेही भामटे तेथून निघून गेले. महिलेने गॅसवर भांडे ठेवले व मिश्रण चमच्याने ढवळत असताना त्या भांड्यात काहीच नाही, अशी जाणीव त्यांना झाली. त्यामुळे त्यांनी लगेच पाहणी केली असता त्यात कोणतेच दागिने नव्हते. महिलेने तातडीने घराबाहेर धाव घेऊन त्या भामट्यांचा शोध घेतला. परंतु ते पसार झाले होते. या घटनेची तक्रार पोलिसांत करण्यात आली आहे.

# ‘सगळे सोबत आहेत तर संघर्ष कशासाठी?’ नवनीत राणांची ‘ती’ पोस्ट चर्चेत

## भाजपमधील अंतर्गत वाद चव्हाट्यावर?

**विदर्भ प्रजासत्ताक**


**दि.२२अमरावती–** लोकसभा निवडणुकीत पराभूत होऊनही नव्या उमेदीने विधानसभा निवडणुकीदरम्यान भाजपच्या उमेदवारांचा जोरदार प्रचार करणाऱ्या माजी खासदार नवनीत राणा या गेल्या काही दिवसांपासून भाजपमधील अंतर्गत विरोध, राज्यसभेची संधी न मिळणे, याविषयी आपली नाराजी उघडपणे व्यक्त करत नसल्या, तरी त्यांच्या समाज माध्यमावरील नव्या ‘रील’मधून ती पुन्हा व्यक्त झाली आहे.


सूचक शब्दात भावना व्यक्त

नवनीत राणा यांनी गेल्या काही दिवसांमध्ये समाज माध्यमांवर संवाद साधताना सूचक शब्दात आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. ताज्या पोस्टमधूनही त्यांनी भावनिक मुद्दे मांडले आहेत. या पोस्टची चांगलीच चर्चा रंगली आहे. ‘तुम्ही संघर्ष करा, आम्ही तुमच्या पाठीशी आहोत,’ हे वाक्य आपल्या सार्वजनिक जीवनात इतक्या वेळा घासून गुळगुळीत झाले आहे की, आता त्यातील गांभीर्यापेक्षा त्यातील उपरोधच अधिक जाणवू लागला आहे. याच वाक्याचा संदर्भ देत नवनीत राणा यांनी वास्तवाचे चटके लोकांना दाखवून दिले आहेत.

### काय म्हणाल्या नवनीत राणा?

समाज माध्यमांवरील पोस्टमध्ये नवनीत राणा यांनी हिंदी भाषेतून आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. ‘लोग कहते है, आप संघर्ष करो, हम आपके साथ है, लेकीन आप साथ है, तो यह संघर्ष क्यो? असा सवाल त्यांनी केला आहे. त्या म्हणतात, कुणीतरी फार चांगले म्हटले आहे; गोष्ट कडू असली तरी सत्य आहे. आयुष्यात तुम्हीही हे अनेकदा ऐकले असेल, लोक म्हणतात– ‘तुम्ही संघर्ष करा, आम्ही तुमच्या सोबत आहोत’, मग जर सगळे सोबत आहेत, तर हा संघर्ष उरतोच कशासाठी?





**यापूर्वीच्या पोस्टमधूनही नाराजी–** नवनीत राणा यांनी यापुर्वी दोन वेळा समाज माध्यमांवर व्यक्त होत असताना आपल्या भावना मांडल्या आहेत. ‘संघर्ष करना मेरे लिए नई बात नही है, मै किसी भी मोड से नई शुरूवात कर सकती हूं’, असे गेल्या महिन्यातील एका पोस्टमध्ये सांगून त्यांनी भविष्यातील संघर्ष सूचित केला होता. नवनीत राणा यांची नाराजी नेमकी कुणाविषयी आहे, याची चर्चा आता सुरू झाली आहे. त्यांच्या कडव्या हिंदुत्वावरील वक्तव्यांवरून अनेकवेळा वाद उद्भवला आहे. परतवाडा लैंगिक शोषण प्रकरणात त्यांनी केलेल्या वक्तव्यांवरून पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी नवनीत राणा यांच्यासह डॉ. अनिल बोंडे यांना नुकतेच खडेबोल सुनावले होते.

सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

